हि.वि.अर्ज क्र. २७/२०२३
शंतनु वि. शितल
निशाणी क्र. २० क्रमश :

**उलटतपास गैरअर्जदाराचे वकिल श्री.आर.बी. उमाळे यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

**१०.** जुन्या प्रकरणात तडजोडीअंती मी लिहून दिले होते की मी गैरअर्जदाराचा चांगला सांभाळ करेल. मी गैरअर्जदाराला दिनांक २५.०१.२०२३ रोजी फारकतीबद्दल नोटीस पाठविली होती. सदरची नोटीस मुंडगावच्या पत्यावर पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळी मी नोटीस पाठविली त्यावेळी गैरअर्जदार माझ्यासोबतच राहत होती. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी मी व गैरअर्जदार माझ्या आईवडीलापासुन वेगळे राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की मी गैरअर्जदारास घेवून गेलो परंतु त्यानंतर मी तिला व्यवस्थित खायलापियाला देत नव्हतो तसेच मुलाच्या दुधाचा उकडा देखील बंद केला होता. हे म्हणणे खरे नाही की मुलाची व गैरअर्जदाराची तब्येत बिघडली होती व त्यावेळी मी त्यांना घराबाहेर काढून दिले. हे म्हणणे खरे नाही की प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्याकरीता मी गैरअर्जदाराला घराबाहेर काढले. गैरअर्जदार माहेरी गेली त्यानंतर मी तिला नांदवण्याचा कुठलाही प्रयत्न केला नाही व वर नमुद नोटीस गैरअर्जदारास पाठविली. हे म्हणणे खरे नाही की मी गैरअर्जदाराला वेळोवेळी फारकतीबद्दल बोललो पण तिने प्रतिसाद दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार ही माझ्याच घरी राहत असल्यामुळे ती नोटीसचे उत्तर देवू शकली नाही.

**११.** हे म्हणणे खरे नाही की जेव्हापासुन गैरअर्जदार माझ्याकडे राहावयास आली तेव्हापासुन ती माझ्यासोबत व माझ्या आईवडीलांसोबत व्यवस्थीत राहीली होती. मला सर्वात अगोदर मुलगा झाला होता तो वारला. त्यानंतर दोन मुली झाल्या. हे म्हणणे खरे नाही की दुसरी मुलगी जन्माला आली म्हणुन मी गैरअर्जदाराचा छळ करीत असे. हे म्हणणे खरे नाही की मी गैरअर्जदाराला मारझोड व शिवीगाळ करीत असे. माझ्या पत्नीला मुलगा झाला व तिचे ते बाळंतपण माझ्या घरीच झाले. बाळंतपणानंतर गैरअर्जदार ही आराम करण्याकरीता तिच्या माहेरी निघुन गेली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर मी गैरअर्जदाराला घ्यायला गेलो नाही व सरळ फारकतीची नोटीस पाठविली. माझ्या लग्नानंतर मी गैरअर्जदार हे माझ्या आईवडीलासोबत सात वर्षाकरीता एकत्र राहीलो होतो. हे म्हणणे खरे नाही की त्या काळात माझे आईवडील गैरअर्जदारास टोचून बोलत असत. हे म्हणणे खरे नाही की मी व माझे आईवडील गैरअर्जदाराला नेहमीच म्हणायचो की, तु लग्नात चांगला हुंडा दिला नाही व चांगले सामान देखील दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की याकारणास्तव मी व माझे आईवडील तिला नेहमी त्रास देत असत. हे म्हणणे खरे नाही की मी छळ

केल्यामुळे गैरअर्जदाराची प्रकृती बिघडली व तिला रक्ताच्या उलटया झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की मी गैरअर्जदाराला माहेरी पाठविले. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदाराने मला फोन करून घेवून जाण्यास सांगितले होते परंतु मी तिला घ्यायला गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की मी व माझा भाउ गैरअर्जदारास खोटी केस करण्याच्या धमक्या देत असत. हे म्हणणे खरे नाही की मी गैरअर्जदाराचा कौटुंबिक, मानसिक व शारीरीक छळ केला.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की माझे आईवडील मी गैरअर्जदाराला त्रास दयावा असे प्रेरीत करीत होते व मी गैरअर्जदाराला त्रासाची वागणुक दिली. गैरअर्जदार ही मला फारकत देण्यास तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की अर्जातील आरोप बिनबुडाचे आहेत.

प्रश्न — गैरअर्जदार तुमच्या सोबत नांदावयास तयार आहे, तुम्ही तयार आहात का ?

उत्तर — नाही.

**१३.** मुंडगावाला माइया आईवडीलांचे नावे व माइया नावे शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की सदरची शेती सुपीक असुन त्यातून भरपूर उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा अर्ज सादर केला व आज रोजी खोटी साक्ष देत आहे तसेच मी खोटी नोटीस दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—

दि.११.०२.२०२६.

( शिवनाथ एम. काळे )<br>
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)<br>
अकोट.